१०.	सम्पूर्ण योग विद्या	राजीव जैन ''त्रिलोक''	मंजुल पब्लिशिंग हाउस , भोपाल
११.	योगोपचार	डॉविश्वास मांडलिक .	योगचैतन्य प्रकाशननासिक ,
१२.	आसन प्राणायाम मुद्रा बंध	स्वामी सत्यानन्द सरस्वती	बिहार योग विद्यालय मुंगेर ,

''कोळसा खाणीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना येणाऱ्या समस्येवर योगाची उपयुक्तता अभ्यासने''

कु. दिपीका सिद्धार्थ बागडे (पाटील)

प्रस्तावना :

आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येकाला आपन समोर असावे असते वाटते व ते प्रयत्न शिलपण असतात. आपण समोर जावे आपले मुल समोर जावे असे प्रत्येकाला वाटते. आपन व आपली मुले समोर जावी असे वाटते त्यासाठी तो सतत धडपडत असतो वाडत्या महागाईमुळे घरचा खर्च भागवीने मुलांचे शिक्षण औषधी यासाठी त्याला दिवस रात्र प्रयत्न करावे लागते. व स्वताच्या आरोग्याकडे लक्ष न देता तो दिवसरात्रधडपडत असतो. या धडपडीमध्ये कारखाण्यात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या आरोग्यावर अतितान पडत असतो या धडपडीमध्ये कारखाण्यात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या आरोग्यावर अतितान पडत असतो. स्वतःच्या प्रकृतीची काळजी न करता सतत काम करणे यामुळे शारिरिक आरोग्य धसळत असते. कामाचे अतिरिक्त तास दर्गम परिस्थीतीमध्ये काम करणे, घरच्या खर्चाचा अतिरिक्त ओज.

कोळसा विश्वातील सर्वात महत्त्वपूर्ण संसाधनामधील एक आहे हा देशातील अर्थव्यवस्थेमध्ये एक अमुलाग्रह भुमीका पार पाढते. यांचे योगदान 50 प्रतिशद प्राथमिक उर्जा उत्पादनाचे श्रेय याला जाते भविष्यातपण उर्जा उत्पादनाच्या रूपामध्ये याची मांगणी राहील. अशी आशा आहे कोळसा उपयोगातील प्रत्येक पाउज जसे खनने दळनवळन, कपडे धुने गाडणे आणि या नंतर राखळेचा निपटारा लावणे या सर्व कामाचा प्रभाव कोळसा क्षेत्राच्या जवळ–पास राहनाऱ्या मानवी समुदायातील लोकांच्या स्वास्थ्यावर पडत आहे कोळसा खननीच्या फळस्वरूपात कोळसा कर्मचाऱ्यांवर विभिन्न प्रकारचे रोग जसे न्यूमांकोनिओसिस उच्च रक्तजाप, हृदय/फेफडयांचे रोग, गुदयांची बिमारी या

 ISSN 2277-7067

रोगांची सक्रीयता वाढते. न्यूमोकोनिओसिस ही फेफडयांची बिमारी आहे ते फेफडयातील गॅसविनीमय क्षेत्रामध्ये कोळश्याच्या डस्ट जमा झाल्यामुळे होते. मानवी स्वास्था व पर्यावरणातील समस्या यांनामधील समस्या हे एक नवे क्षेत्र आहे यामध्ये भूविज्ञान व चिकित्सा विज्ञान दोन्हींच्या आवश्यकता आहे. खनन क्षेत्रांमध्ये कार्यरत सहकार्याची असणारे कर्मचारी व खनन क्षेत्राच्या आजुबाजुला राहणाऱ्या लोकांना निरंतर कोळशाच्या धुळीमध्ये राहात असल्यामुळे त्यांना श्वासा संबंधी होणाऱ्या रोगाबद्दल ते अतिसंवेदन शिल असतात.

आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये आतन समोर जावे असे प्रत्येकाला वाटत असते व प्रयत्न असतात आपण समोर जावे आपले मुल समोर जावेत यासाठी ता सतत धडपड करत असतो. वाढत्या महागाईमुळे घरातील खर्च मुलांच्या शिक्षणाचा खर्च, औषधी, अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याला सतत धडपड करावी लागते. रात्रदिवस एक करून तो सतत कार्यकरीत असतो. स्वताःच्या आरोग्याकडे लक्ष नदेता नेहमी कार्यकरत असल्यामुळे त्याचे आरोग्यात बिघाड येते व कामाच्या जागेवरील स्थिती डस्ट कामाचे तास यामुळे त्याची शारीरिक स्थितीमध्ये सतत बिघाड येते व तो कमी कार्यक्षम होत असतो सतत काय करणे करणे यामुळे शारीरिक आरोग्य धसळत असते.

कोळसा खाणीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यत सुधारणा करणे त्यांचा शरीराचा मनाचा आणि बुध्दिचा सर्वांगीण विकास म्हणजे व्यक्तिविकास होय कर्मचाऱ्याचे शारीरिक, मानसिक, बौध्दिक, आध्यात्मिक, नैतिक अशी सर्वागीण उन्नती करणे त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व फुलते. आरोग्य आणि मानसिक स्वास्थ लाभावे. त्याच व्यक्ति विकास व्हावा यासाठी योग साधनेद्वारे त्यांचा विकास घडवून आणने.

कोळसा खाणीचा परिचय –

कोळसा खननाचा इतिहास भारतामध्ये खुप जुना आहे. भारतातील दामोदर नदीच्या पश्चिम काठावर रानीगंजमध्ये ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने 1774 मध्ये कोळशाचे वानिज्जीकरण खनन आरंभ केले. यानंतर काही काळापर्यंत कोळसा खाणीचे कार्य कासव गतिने चालले. कोळस्याची मागणी खुप कमी होती. परंतु 1853 मध्ये कोळसा इंधनावर चालनाऱ्या रेल्वे वाहतुकीची सुरूवात झाली व तेव्हा पासुन कोळस्याची मागणी वाढली व कोळसा खदानीच्या कामाला प्रोत्साहन मिळाले. त्यानंतर कोळशाचे उत्पादन 1 मिलीयन मॅट्रीक टन प्रती वर्ष झाले. 19 व्या शताब्दीच्या अखेर पर्यंत भारतात उत्पादन 6.12 मिलीयन टन वार्षीक झाले आणि 1920 पर्यंत 18 मिलीयन मॅट्रीक टन वार्षीक प्रथम विश्वयुध्दाच्या वेळी उत्पादनामध्ये सहसा वृध्दी झाली. परंतु 1930 च्या सुरूवातीच्या काळामध्ये आणखी उत्पादनामध्ये कमी आली. 1942 पर्यंत उत्पादन 29 मिलीयन मॅट्रीक टन प्रती वर्ष होते. परंतु 1946 मध्ये मिलीयन मॅट्रीक टन झाले. भारतात विश्वामधील 4.7 टक्के कोळसा उत्पादन होते.

कोळसा खदाणीमधील कर्मचाऱ्यांच्या समस्या –

आपल्या देशात कोळसा उद्योगाला 1970 ते 1980 शतकात औद्योगीकीकरणामुळे मोठया प्रमाणात चालना मिळाली. त्यामुळे कोळसा उद्योगाचे झपाटयाने राजकियकरण सुध्दा झाले. मात्र त्याचवेळी कोळसाखाण कामगाराच्या आयुष्याचे अवमूल्यांकन देखील झाले. कोळसा उद्योगातुन अनेकाचे हात 'पांढरे' झाले. आणि श्रीमंतही अवतरली मात्र कोळसाखाण कामगाराच्या जिवनाचे कमाल मुल्य फक्त 10 लाा रूपयेच राहिले. त्यांच्यावर आजही अपघाती मृत्युची टांगती तलवार तशीच कायम आहे. 4 मे हा दिवस 'कोळसाखान' कामगार दिन म्हणुन पाळला जातो. अर्थात त्यामुळे या कामगाराच्या आयुष्यात काही फरक पडलेला नाही. ज्याच्या नशिबातला अंधकार मात्र अजुनही कायम आहे.

समस्या –

- कोळसा खदानीमध्ये कार्यरत असलेल्या मोठया मशिनरी व डीजेल चा उपयोग केला जातो. त्यामुळे जास्त प्रमाणात मशीनचा आवाज व धुळीचे उत्सर्जण होते. त्यामुळे श्वसन व श्रवणाचे आजार उद्भवतात.
- कोळसा खननाचा मानवी शरीराशी एक महत्त्वपूर्ण सहसंबंध आहे. उच्च स्तराच्या कोळसा उत्पादनाचा प्रतीकूल प्रभाव मानवी स्वास्थावर पडतो.
- ज्यामुळे फुफ्फुसाचे रोग, उच्च रक्तदाब, गुदर्याचे आजार होण्याची प्रबळ आशंका असते.
- मुलांमध्ये श्वासासंबंधी रोग जसे – श्वास घेण्यास अडथळा, खोकल्याचा प्रमाणात वृद्धी झालेली दिसते.
- जन्माला आलेल्या लहान बाळाचे वजन कमी असणे, रक्तामध्ये उच्च क्षीण आणि फॉडमी यांची मात्रा जास्त प्रमाणात आढळून येते.
- खनणाच्या क्रिस्तलीय सिलीकाच्या कारणामुळे सिलीकॉसीस शंका असते. जास्त दीर्घकाळाने फुफ्फुसाचे रोग उत्पन्न होतात.
- क्रिस्तलीय सिलीकाच्या जास्त वेळ असलेल्या प्रभावामुळे फुफ्फुसाच्या कर्करोगाची शक्यता असते.
- कोळश्याच्या धुरीमुळे श्रमीकांना न्युमोाकेनियासिसचा काळा फुफ्फुस आणि जास्त काळ टिकणारा फेफडयांचा रोग उत्पन्न करू शकतो.
- श्वसनाच्या रोगानी ग्रासीत असलेल्या श्रमीकांमध्ये 24 टक्के गॅस्ट्रो आणि तापाचे मरीज आढळून आलेले आहे.

सामान्य रोग

- खणन क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांमध्ये व खदानीत काम करणाऱ्या महिलांमध्ये चक्कर येणे ही लक्षणे आढळून येतात.

- खणन क्षेत्रातील बिकट परिस्थितीमुळे व खराब स्वास्थ्यामुळे तेथील लोकांना मानसिक तनाव व शरीरावरील सूजनाच्या शंका असतात.
- **नेत्र** – खुल्या कोळसाची उडणारी धूर ही डोळयांना हानी पोहचवते. व डोळयांमधील जळजळ हे पुरूषांमध्ये महिलांच्या तुलनेत जास्त प्रमाणात असते. कारण खनन क्षेत्रामध्ये पुरूषांकडून जास्त प्रमाणात बाहेरील कामे केली जाते.
- **कान / श्रवण** – कोळसा खदानी मध्ये काम करणाऱ्या पुरूषांमध्ये श्रवणाच्या त्रासेचे प्रमाण आढळून आले आहे.
- **श्वसन** – कोळसा खदानीमध्ये कार्यरत असलेल्या श्रमिकांमध्ये खोकला, दमा, अस्थमा इ. आजार मोठया प्रमाणात आढळून आले आहे.
- **त्वचा** – खनन क्षेत्राच्या जवळपास राहणाऱ्या लोकांना त्वचेची ॲलर्जी व त्वचेच्या वरच्या भागामध्ये सूजन एक स्वाभाविक गोष्ट आहे.

योगाची उपयुक्तता

कोळसा खदानीमध्ये कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणते आजार असू शकतात याचा अभ्यास केला आहे. त्या आजारावर उपचार म्हणून योग कसा महत्वाचा ठरू शकतो ते पुढील प्रमाणे :–

योग’ हे भारताचे परंपरागत शास्त्र आहे. भारताने जगाला वेदांखेरीज व्याकरण, गणित व योग ही दिव्य शास्त्रेही दिली. योग तर भारतीय तत्वज्ञान व संस्कृतिचा गाभा आहे. न्याय, वैशिषिक, सांरण्य, योग पूर्वमिमांसा व उत्तरमिमांसा ही सहादर्शन शास्त्रे आहेत. आयुर्वेदाने आपल्या ‘स्वस्थवृत्त’ भागात योगाचा समावेश केला आहे. श्रीभगवदगीतेते तर योगशास्त्राच्या सर्व अंगावर सुंदर भाष्य आहे. आज संपूर्ण जगात योगशास्त्रामुळे भारताकडे अत्यंत आदराने बघितले जाते.

योगाद्वारे निराकरण

सकाळपासून ते रात्री झोपेपर्यंत दैनंदिन व्यवसायानिमित्त आपण जे काही काम करतो त्या प्रत्येक कामापासून शरीराच्या कोणत्या ना कोणत्या तरी अवयवांना चालना मिळतेच ज्या अवयवांना चालना मिळते तेथीलच भाग कार्यक्षम होते परंतु त्याचवेळी त्यांच्याविरूध्द बाजूस मुळीच ताण पडत नाही आणि हे नित्याच्या व्यावसायिक कामाच्या स्वरूपामुळे असेच जेव्हा सतत सुरू असते तेव्हा अनुभवातील असे लक्षात येते की वाढत्या वयाबरोबर शरीराच्या निरनिराळया अवयवांच्या अकार्यक्षमतेमुळेच तेथे एखादी दुसरी विकृती झालेली आहे असे वैद्यकिय तपासणीतून दिसून येते. तेव्हा ते तसे होऊ नये म्हणून शरीराच्या सर्व भागांना कार्यक्षम ठेवण्याच्या हेतुने निरनिराळी योगासने करणे आवश्यक आहे.

योगाभ्यास सुक्ष्मव्यायाम

1) कपोलशक्ति विकासक
2) कर्णशक्ती विकासक
3) कर्तलशक्ती विकासक
4) मणिबंधशक्ति विकासक
5) पुर्णशुजशक्ती विकासक
6) वक्षस्थलशक्ति विकासक
7) जंगाशक्ती विकासक
8) पादमुलशक्ती विकासक

सुर्यनमस्कार

भारतीय पारंपरिक व्यायाम पद्धतीमध्ये सुर्यनमस्काराला फार मोठे मानाचे स्थान आहे. ही एक सुर्याची उपासना आहे. सर्व ऊर्जेचे स्त्रोत म्हणजे सुर्य. सकाळी सुर्योदयाच्या वेळी उघडया अंगाने सुर्यनमस्कार घातल्याने संपूर्ण शरीराला चांगला फायदा होतो. शरीरातील प्राण उर्जेला उत्तेजित करण्याकरिता

सुर्यनमस्काराची भुमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. स्वस्थ शरीर व क्रियाशील जीवन हा आध्यात्मिक विकासाचा आधार आहे. सुर्यनमस्कार ही अतिप्राचीन शरीर व मनाच्या संवर्धनासोबतच आध्यात्मिक बल वाढविण्याकरिता योगाभ्यासामध्ये उपयोगात आणली जाणारी एक योगिक पद्धत आहे.

वैदिक काळापासून सुर्यनमस्काराची उपासना केली जात असली तरी सुर्यनमस्कार ही एक व्यायाम पद्धती असल्याचा बहुतेकांचा समज आहे. सुर्यनमस्कारामध्ये एकुण 12 आसनांचा समावेश होतो.

सुर्यनमस्कारांची संख्या सुरवातीला कमी व नंतर सरावाने हळूहळू वाढवावी. सुर्य नमस्काराची स्थिती व बिजमत्रे खालीलप्रमाणे,

1. ॐ हयं मित्राये नमः।
2. ॐ ही रवये नमः।
3. ॐ हूं सुर्याय नमः।
4. ॐ है भानवे नमः।
5. ॐ हौ खगाय नमः।
6. ॐ ह्ः पुष्णे नमः।
7. ॐ हां हिरण्यगर्भाय नमः।
8. ॐ हीं मरीचये नमः।
9. ॐ हू आदित्याय नमः।
10. ॐ है सवित्रे नमः।
11. ॐ हौ अकार्य नमः।
12. ॐ ह्रः भास्कराय नमः।

''एखादया झाकणानं पात्र झाकाव, तसं तुझ्या सुवर्णमंडलानं 'सत्य' झाकलं गेलं आहे म्हणून हे सुर्या! हे आवरण दूर करून तुच मला सत्य दर्शन घडवं।'' (इश उप. 15)

सूर्यनमस्कारातील बारा आसने पुढीलप्रमाणे –

1) उर्ध्वनमस्कारासन

2) हस्तपादासन

3) एकपाद प्रसारणासन

4) व्दिपाद प्रसरणासन

5) शशांकासन

6) साष्टांगप्राणिपादासन

7) भुजंगासन

8) भुधरासन

9) शंशाकासन

10) दक्षिणपाद प्रसरनासन

11) हस्तपादासन

12) उर्ध्वनमस्कारासन

आसन

आसन हे योगाचे खास वैशिष्टय आहे. योगासने योग्याला शरीराच्या माध्यमातून अध्यात्माकडे नेतात. आसने. योगविद्येची सुरूवातच तर तिचा पायाही आहेत.

आसन म्हणजे देह देवाचे मंदिर अशा भावनेने धारण केलेली विशिष्ट शरीरिस्थिती. शरीररातील देवत्वाच्या अंशाला धक्का लागु नये म्हणून आसनस्थिर असले पाहिजे. आसन करण्यातील शारिरीक श्रमांचा भाग सरावाने कमी करण्यातील शारिरीक श्रमांचा भाग सरावाने कमी होउन स्थिरत्व येते. तेव्हाच 'आसन –जय' किंवा आसनात नैपुण्य आले असे समजावे. स्थैर्यामुळे 'सुखत्मा' म्हणजेच सुखाचा अनुभव येतो. अशा स्थितीतील आसनाचा कर्ता शरीर अथवा मन नसुन अंतरात्मा असतो. या अवस्थेत शरीरावर प्रभुत्व मिळालेले असते. मनातील व्दंव्दे अंतर्धान पावलेली असतात आणि देह चिल व आत्मा ही एकरूप झालेली असतात.

महर्जी व पतंजलीनी योगदर्शनातील आहारयोगामध्ये 3 अंगामध्ये आसनाचे वर्णन केलेले आहे. त्यांनी आसनाची व्याख्या खालील प्रमाणे केली.

''स्थिरसुमासनम्'' (प्रा. यो. सु. 2146)

ज्या स्थितीमध्ये स्थिरता सुख व समाधान प्राप्त होते त्या स्थितीला आसन म्हणतात. आसन हे पुर्ण विचारानी व लसपुर्वक केले जाते. ते सुखदायकही असले पाहीजे व स्थिरही असले पाहीजे. महर्षी पातंजलीनी म्हटले आहे की, ''पृथ्वीतलावर जेवढी जीवजंतूची संख्या आहे तेवढीच आसनाची संख्या आहे.''

आसनाचे तीन प्रकार सांगितले आहे.

1) शरिर संवर्धनात्मक आसने

2) विश्रामदायी आसने

3) ध्यानात्मक आसने

तसेच आसनाचा अभ्यास चार भागामध्ये विभागला आहे.

1) शयन स्थितीतील आसने

2) विपरीत शयन स्थितीतील आसने

3) बैठक स्थितीतील आसने

4) दंडस्थितीतील आसने

प्राणायाम

प्राणायाम हा शब्द 'प्राण' व 'आयाम' या दोन शब्दांनी बनला आहे. प्राण आपली जीवनशक्ती (व्हायटल फोर्स) असून त्यामुळेच मनासकट सर्व इंद्रियांना काम करण्याची शक्ती (प्रेरणा) मिळते, रक्तभिसरण, श्वसन ही कार्य प्राणशक्तीमुळेच चालतात. आयाम याचा अर्थ प्राणशक्तीवर ऐच्छिक नियंत्रण आणून तिला योग्य दिशेने वळविणे, वाढविणे, विस्तारणे, श्वसन हे कार्य प्राणशक्तीचे नियंत्रणखाली असले तरी आपण त्यावर बऱ्याच प्रमाणात ऐच्छिक नियंत्रण आणू शकतो. श्वसनाचा मनाशी व चित्ताशीही संबंध आहे. याचाच

फायदा योगाने घेतला आहे. प्राणशक्तीवर नियंत्रण आणताच मनावर व चित्तावर आपोआपच नियंत्रण येते.

पातंजल मुनीने यास स्तंभवृत्ती म्हटलेले आहे व एकूण चार प्रकारचे स्तंभ सांगितले आहे.

1) दीर्घ व मंद अशा प्रश्वासानंतर किंचित काळ थांबणे.

2) प्रदीर्घ व खोल अशा श्वासानांतरचा स्तंभ

3) आपल्याला वाटेल तेथे उदा. श्वासप्रश्वास पूर्ण होण्यापूर्वीच थांबणे.

4) साधकास मुद्दाम थांबवावा लागत नाही तर आपोआप थांबणारा श्वासप्रश्वास, याला केवलकुंभक असेही म्हणतात. सामान्य श्वासप्रश्वासात खडे पडला की प्राणायाम झाला.

हठयोग प्रदिपीकेमध्ये

("चलेवाते चलं चित्त निश्चले निश्चल म भवेत
योगी स्थायु चमाप्नोती ततो वायु निरोधयेत।।") (ह.प्र.2.2)

हठयोग प्रदीपीकेतील दुसऱ्या अध्यायातील दुसऱ्या सुत्रात स्वामी स्वात्माराम सुरी यांनी चित्तावर विजय मिळविण्याकरिता व चित्तवृत्तीचा निरोध करण्याकरिता प्राणायाम महत्वपूर्ण सांगितलेले आहे. पतंजली योगदर्शन या ग्रंथामध्ये महर्षी पतंजली यांनी

"तास्मिन्सती श्वासप्रश्वास योगतिच्छेदः प्राणायामः।।" (पा.यो.सू. 2/49)

या सुत्राद्वारे प्राणवायूचे शरीरामध्ये प्रविष्ठ होते. म्हणजे श्वास बाहेर निघणे प्रश्वास या दोन्ही गतीचे थांबणे अर्थात प्राणवायुच्या गमनागमन क्रियेचे बंद होणे प्राणायमाचे लक्षणे सांगितली आहेत.

- **प्राणायामाचे प्रकार –**
- **अनुलोम विलोम (नाडीशोधन)**

- **सुर्यभेदन प्राणायाम**
- **भ्रामरी प्राणायाम**
- **उज्जायी प्राणायाम**
- **भस्त्रिका प्राणायाम**

शुद्धीकिया –

मानवी शरीर हे त्रिदोषापासून बनलेले आहे. वात, पित्त व कफ. हे तीन दोष समप्रमाणात असल्यास शरीर निरोगी राहील. त्याकरीता योगाभ्यास मध्ये षट्कर्म सांगितले आहे.

''समदोषः समाग्निध समधातु मलक्रिया ।
प्रसन्न आत्मेन्द्रियमनरू स्वस्थ इत्यादिधयिते ।।''

सुश्रुतामध्ये स्वास्थ म्हणजे काय? ही स्वास्थ्याची व्याख्या करताना सुत्राद्वारे स्पष्ट केले आहे. जेव्हा दोन साम्यावस्थेत अग्निचे कार्य समस्थितीत असते. धातू समस्थितीत असतात व मल विसर्जनाची क्रिया उत्तम असून मन इंद्रिय व आत्मा प्रसन्न असतात. तेव्हा त्या स्थितीस स्वास्थ असे म्हणतात.

योग शास्त्रामध्ये शुद्धिक्रियांना फार महत्त्व आहे. शरीरातंर्गत पोकळी स्वच्छ करून मोकळया करणे म्हणजे शुद्धीक्रिया होय. ह्या पोकळ्या स्वच्छ झाल्या की तयातून वाहणारे रक्त, रस, हवा, प्राण यांना होणारा अडथळा दूर होतो व संपूर्ण शरीरभर रक्तसंचार सुयोग होतो. या शुद्धीक्रिया षट्कर्म असे म्हणतात. धौती, बस्ती, नेती, नौली, त्राटक, कपालभाती ह्या सहा शुद्धिक्रिया आहे.

''धौतिबस्तीस्तधानेती नौलीकी त्राटकं तथा ।
कपालभातिश्चेतानि षट्कर्माणि समाचरेत् ।।'' (घेरण्डसंहिता)

या सहा शुद्धिक्रियेचे वर्णन घेरण्डसंहिता हठयोग प्रदिपिका तसेच घेरण्ड संहितेमध्ये दिलेले आहे. शुद्धिक्रिया ह्या आसन व प्राणायामापूर्वी करावा असे प्रत्येक ग्रंथामध्ये सांगितले आहे.

1) हट्धौति – वस्त्रधौति

2) मुलशोधन धौति (गणेशक्रिया)

3) नेती

4) कपालभाति

5) त्राटक

Protocol

अ.क्र.	वेळ	आसन क्रिया	प्रयोजन	कालावधी
1	7.0 ते 7.2	गुरूवंदना /ऊँकार जप	पाठीच ओळख व एकाग्रता	2 मी.
2	7.2 ते 7.4	पुरक हालचाली	उजळणी	2 मी.
3	7.4 ते 7.15	सूर्यनमस्कार	उजळणी	11 मी.
4	7.15 ते 7.16	भुजंगासन	उजळणी	1 मी.
5	7.16 ते 7.17	शलभासन	उजळणी	1 मी.
6	7.17 ते 7.27	धनुरासन	नविन शिकवणी	10 मी
7	7.27 ते 7.28	स्वस्थीकासन	उजळणी	1 मी.
8	7.28 ते 7.29	आकर्ण धनुरासन	उजळणी	1 मी.
9	7.29 ते 7.30	पद्मासन योगमुद्रा	उजळणी	1 मी.
10	7.30 ते 7.37	अर्धमस्येदासन	नवीन शिकवणी	7 मी.
11	7.37 ते 7.38	वृक्षासन	उजळणी	1 मी.
12	7.38 ते 7.39	उत्कटासन	उजळणी	1 मी.
13	7.39 ते 7.40	शवासन	विश्रांती	1 मी.
14	7.40 ते 7.42	दिर्घश्वसन	प्राणायाम	2 मी.
15	7.42 ते 7.44	सूर्यभेदन प्राणायाम	प्राणायाम	2 मी.
16	7.44 ते 7.46	उजाही प्राणायाम	प्राणायाम	2 मी.
17	7.46 ते 7.48	भ्रामरी	प्राणायाम	2 मी.
18	7.48 ते 7.50	त्राटक	प्राणायाम	2 मी.
19	7.50 ते 7.54	ऊँकार जप		4 मी.
20	7.54 ते 7.56	प्रार्थना	मनशांती	2 मी.
21	7.56 ते 8.00	वृक्षासन नमस्कारसन		4 मी.
		वर्गविराम		

उपसंहार –

कोळसा खानीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना येणाऱ्या समस्येवर योगाची उपयुक्तता अभ्यासने हा माझा संशोधनाचा विषय आहे. जागतीक आरोग्य

संघटनेच्या स्वास्थाच्या संकल्पनेनुसार कामगारांना आरोग्य प्रदान करणे हा माझा प्रमुख उद्देश आहे.

कोळसा खनाचा इतिहास भारतामध्ये खुप जुना आहे. अनेक कामगार कोळसा खदानीमध्ये कार्य करीत असतात आपल्या जिवाची पर्वा न करता खदानीतील अती दुर्गम भागामध्ये मजुर कार्य करतात कोळसा खदानी या खुप खोल असतात व गुंपे सारख्या असतात व या जागेवर जाऊन खोद काम करणे व तेथील कोळसा बाहेर काडणे त्यामुळे त्यांनी शारीरिक तान खुप सहन करावा लागतो पृथ्वीच्या भुभागात जाऊन त्यांना काम करावे लागते. त्यामुळे तेथील प्रानवायुची कमी याचा परिणाम त्याच्या श्वसनावर सुध्दा होतो खदानीच्या जागेवर वापरल्या जानाऱ्या मोठमोठा मशीनीचा आवाज त्यामुळे त्याचा परिणाम त्यांचा श्रवण ईद्रीयांवर पन होतो

अश्याप्रकारे अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांचे शरीर अती कमजोर होते व अनेक आजाराने ते ग्रासले जातात व त्यातल्या त्यात त्यांना मिळनारा मोबदला तो अती कमी असल्यामुळे ते आपल्या आरोग्याची काळजी घेऊ शकत नाही. पोष्टीक आहाराची कमतरता आरोग्यदाई सेवेचा अभाव यामुळे त्यांचे आरोग्य धसळत जाते व त्यांना अनेक शारीरीक समस्या उद्भवतात. 1. नेत्राच्या समस्या 2. कानाच्या समस्या 3. श्वसना संबंधी समस्या इ. समस्या त्यांना काम करतांना भेडसावत असतात. त्या समस्या दुर करण्याचा प्रयत्न योगाद्वारे त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

कापूस कारखान्यातील कामगारांच्या समस्यांवर योग प्रकिया

शिल्पा वसंतराव येनगटवार

भारत हा कृषीप्रधान देश आहेया सोन्याची भूमी-भारत ही पांढ . म्हटल्या जाते तसेच भारतात कच्चा माला पासून पक्का माल तयार केला जातो असे अनेक कच्चा मालाचे कारखाने भारतात आहेत्यातून एक म्हणजे कापूस कारखाना . कमी शिक्षण झाल्यामुळे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी रोजगार मिळण्यास स्त्री पुरुष काम मिळण्यासाठी कापूस कारखान्यात काम करतातकापूस . कारखान्यातील महत्व भारतातील कापसामुळे सुत तयार होत असून त्यापासून मोठया प्रमाणात सुती वस्त्र तयार होते तसेच सुती वस्त्राचे उद्योग देशात सगळ्यात मोठा संगठित उद्योग आहे.

प्रस्तावना

योग्य हा शब्द यजु या संस्कृत धातू पासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्मात विलीन होणे योग ही भारतातील पाच हजार वर्त प्राचीन ज्ञान शैली आहे हिंदू दर्शनातील प्राचीन मूलभुत सूत्रांच्या रुपामध्ये योगाची चर्चा आहे ज्याचा अलंकुत उल्लेख पतंजली योग सूत्रामध्ये आहे. मानवी जीवन उदरनिर्वाहासाठी तसेच कमी शिकले असल्यामुळे कुठेतरी काम करुन पैसा मिळवण्यासाठी व्यक्ती कुठेही काम करण्यास तयार असतो.

कापूस कारखाना यात कामगार वर्गात ब-याच समस्या येत असतात जसे वरिष्ट वर्ग हा लहान कामगारांना कमजोर समजत असून त्याची पिळवणूक होत असते. कारखान्यात ब-याच कामगारांची वरिष्ठ वर्गाची रेलचेल चालत असते. परिस्थिती मालक वर्ग वेगळा बसत असून कारखान्यात कापूस आनल्या जात असून त्याला पिंजला जातो म्हणजे त्याच्या बीया वेगळया

केल्या जातात मशीनमध्ये कापूसाचे बोन्ड टाकून बीया वेगळया केल्या जातात कापसाचे जे बारीक कण वातावरण पसरल्या जातात व यंत्र सामग्री असल्यामुळे तीथले वातावरण गर्म असते.

कापूस कारखान्यात श्वसता संबंधी आजार निर्माण होतात. तसेच आळीपाळीने कामाचे तास असल्यामुळे पुरेशी झोप न होणे अॅसिडीचा व पिताचा त्रास डोके दुःखी या सारखे आजार निर्माण होतात. यात आसन प्राणायाम शुद्धीकिया याचा वापर कामगारांवर उपयोग करणार आहे. योगामुळे कामगाराच्या जीवनशैली सुधारण्यास मदत होईल म्हणुन मला या विषयाचे अध्ययन करणे आवश्यक वाटत आहे.

उद्देश

१) कापूस कामगारांच्या समस्याचा शोध घेण्यात आला.

२) कापूस कामगारांच्या समस्यांवर उपाययोजना म्हणून योगप्रक्रियाचे उपयोजन करणे, अध्ययन केल्यानंतर जी माहिती मिळाली त्या समस्यांवर उपाय करण्यात आले आहे.

महत्व

कंपनीमध्ये काम करणारे कामगाराच्या श्वसनासंबंधी कापसापासून जे बारीक कण आत जाते. ज्यापासून त्यांना श्वसन संबंधी आजार आणि टी.व्ही सारख्या गंभीर आजारमध्ये मोडते.

योगाद्वारे या आजारांवर लाभ होते योगामध्ये आसन प्राणायाम, शुद्धीकियाद्वारे आजारांवर नियंत्रण केल्या जाऊ शकते. कारखान्यात मजूरांच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार केला आहे.

पूर्व साहित्याचा आढावा

शोध घेतले असतात या साहित्याची माहिती कुठेही उपलब्ध नाही असे लक्षात आले.

संशोधनाची पद्धती

या साठी संशोधनकर्तीने गुणात्मक, वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

तथ्य संकलन

यामध्ये संशोधनकर्तीने प्राथमिक स्त्रोतामध्ये वैयक्तिक मुलाखत टेलिफोन यांचा वापर करण्यात आलेला आहे.

संशोधनाची व्याप्ती

कापूस कारखान्यातील काम करणा-या मजूरांच्या समस्यावर प्रकाश टाकलेला आहे. कापूस कारखा-यातील कर्मचारी वर्ग हा ४ थ्या आहे. वर्धा जिल्हामधील पूलगाव हे गाव मर्यादिस आहे.

मर्यादा

१) प्रस्तुत संशोधन हे कापूस कामगार पुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे केवळ समस्यावर मर्यादीत आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे समस्या दूर करण्यासाठी कामगारांना कापसापासून होणा-या आजाराची तपासणी करणे या पुरतेच मर्यादीत आहे.

कारखान्याची माहिती

कापूस कारखाना हा पुलगाव येथील असून तो १० एकरा मध्ये वसलेला आहे. तेथे वेगवेगळया विभागाच्या रुम आहेत. कारखान्याची स्थापना सन १८८९ मधे झालेली आहे. कापूस कारखान्यात एकुण संख्या ३५० आहे. पुरुष २५० तर स्त्री १५० आहे.

कापूस कारखान्यातील वातावरण

कापूस कारखान्यात कापसाचे बारीक कण जास्त प्रमाणात असून कापसावर अनेक प्रकारच्या किया केल्या जातात अनेक वेगवेगळया मशनरी आहे. कच्चा मालात पक्का माल म्हणजे सुत तयार केला जातो.

१) कारखान्यात कापसाची बेल आणून त्यावर वेगवेगळया मशनरी असून त्यावर प्रक्रिया केल्या जाते सुरवातीला ब्लोरुम लाईन मशीन मधून कापूस स्वच्छ केल्या जातो. २) काडौंग मशीन - ही मशीन चांगल्या प्रतीचा कापूसात रेशेत तयार केल्या जातो.

३) बॅकरडा - ही मशीन मोठा आणि पातळ अंगढया ऐवढया जाडा दोरा बनवते.

४) युनिलेप - कोमचा माल तयार होवून कोम्बर मशीन मध्ये चालवणारी लॅमचा निर्माण होते.

५) कोबर - केस ज्या प्रमाणे विचरले जाते त्या प्रमाणे विचरल्या जाते.

६) फिनिरार डॉ. फेम - सलावर शेवटी सुधारल्या जाते.

७) स्पीड प्रेम - फिनिशींग सलावर रिंग फेम खिचून जाडया दो-याला पातळ केल्या जातो.

८) रिंग फेम - रोवींग बनवते धागा विळ देवून बनवते.

९) ब्लीक कोन - पक्का धागा तयार झाल्यावर बन्डल तयार केल्या जाते.

कारखान्यात येणा-या समस्या

कारखान्यात कामगार नियमित न आल्यापुढे उत्पादनात घट होते. कारखान्यात एखादी मशीन खराब झाल्यावर त्याचा परिणाम मालावर होतो.

कामगार

औद्योगिक विकासाबरोबर भारतात कामगार वर्ग निर्माण होऊ लागला त्याचबरोबर परकिय मालाच्या स्पर्धमध्ये भारतातील लघुउद्योग कुटीर व ग्रामीण उद्योगाचा -हास होऊ लागला.

कामगाराची जीवनशैली

कापूस कारखान्यात काम करीत असतांना कामगार हा खूप श्रीमंत नसून तो आपला उदरनिर्वाह करण्यासाठी कारखान्यात काम करीत असतो त्याला आपल्या मुलाचे शिक्षण हे जिल्हा परिषद होत असते. दोन वेळच खान त्याला मोठया मुशकीलीनी करत असतो. श्रीमंता सारखे चोचले त्याला झेपत नाही.

स्त्री कामगार वर्गाची जीवनशैली

स्त्री कामगार वर्ग हा पुरुष प्रधान वर्ग हा व्यसनाधीन असल्यास मुलाचे पालन पोषण करण्यासाठी त्यांना दोन वेळचे जेवण शिक्षण शिकवण्यासाठी ती स्वतः हा काम करते.

तरुण मुलीचे जीवन शैली

घरी आर्थिक मदत करणारे की नाही नसल्यामुळे तसेच आपल्या गरजा भागवण्यासाठी ती काम करते.

कामगाराच्या श्वसना संबंधी आजार

कापसाचे बारीक कण श्वसनमार्गाद्वारे फुफ्फुसात जातात कापसाचे बारीक कण फुफ्फुसात गेल्यामुळे श्वास घ्यायला त्रास होतो तसेच अनेक प्रकारचे आजार निर्माण होतो सर्दी खोकला मग ते दमात रुपांतर होते.

योग प्रक्रिया

प्राणायाम दोन शब्दानी बनला आहे. (प्राण + आयाम) पहीला शब्द "प्राण" दुसरा शब्द आयाम.

अनुलोमविलोम

अनुलोमविलोम नाडीशोधन म्हटल्या जाते यात ज्या ७२ हजार नाडया आहे. अनुलोमविलोम केल्याने नाडया शुद्ध होतात. डाव्या नासीकेने श्वास घ्यायचा उजवी नासीकेने सोडून उजवीनेच घेवून डावीने सोडव्यायचा असे पाच आवरण करुन डाव्या नासीकेने श्वास थांबवायचा.

भस्त्रीका प्राणायाम

लोहाचा भाताप्रमाणे नाद निर्माण होतो म्हणुन भस्त्रीका प्राणायाम म्हणतात. पुरक रेचक करण्याला भस्त्रीका प्राणायाम म्हणतात. हा प्राणायाम केल्याने श्वासासंबंधी आजार कमी होतो. शरीरातील नाडया शुद्ध होतात.

सुर्यभेदन प्राणायाम

हा प्राणायाम केल्याने शरीरात उष्णता निर्माण होते. हा प्राणायाम उन्हाळात करु नये हा प्राणायाम केल्याने वात दोष कृमी दोष दुर होतो. तसेच कपाल प्रदेश स्वच्छ होतो.

भामरी प्राणायाम

हा प्राणायाम भमरजा प्रमाणे गुंजन करतो त्या प्रमाणे आहे. या प्राणायामाने तणावमुक्त होतो, मन शांत होते. एकाग्रता वाढते कारखान्यात काम केल्याने जो तणाव निर्माण होतो तो ताण दुर होतो.

आसन

कारखान्यातील कामगारांच्या समस्या जाणुन घेतल्यावर संशोधकाने या प्रक्रियेवर पोहचली कामगार हा काम करीत असतांना सतत उभे राहावे लागल्यामुळे पायाच्या त्रास पाठीचा, पाठीचा त्रास जाणवतो. हात, पाय पुर्ण शरीर जखडल्या सारखे होते. त्यामुळे संशोधकाने आसनांचा वापर केल्यामुळे कामगारावर आसनाचा फायदा होईल.

शलभासन, भुजंगासन, धनुरासन हे सगळे आसन विपरीत शयनस्थितीत असुन हे आसन कमरेचा त्रास असल्यास उपयुक्त आहे. तसेच गोमुखासन हे आसन कपदोष नाहीसे करण्यासाठी उपयुक्त आहे. तसेच उष्ट्रासन फुफ्फुसाचे कार्यक्षमता वाढवते. तसेच गुडघ्याचे आरोग्य उत्तम राहते. कमरेचा स्नायु बलवान होते.

शुध्दीक्रिया

कपालभाती या शब्दाचा अर्थ भालप्रदेश तेजस्वी करणारी चमकवीणारी किया या क्रियेमुळे नासीकापासुन ते फुफ्फुसापर्यंतचा श्वसनमार्ग तसेच श्वसन संस्थेचा व त्या सलग असलेला मज्जा संस्थेचा उपयोग केल्या जातो. श्वसनासंबंधी आजारावर उपयुक्त अशी शुध्दीक्रिया आहे.

जलनेती

या शुध्दीकियेमुळे वारंवार सर्दी, ऐर्लजी, खोकला असणा-यांना तसेच डोळे, डोकेदुखी पासुन आराम मिळतो.

वमन

ही शुध्दीकिया दोनदा केल्या जाते. उपाशा पोटी केल्या जाते. त्यात पित्त, कफ निघते तसेच जेवण झाल्यावर लगेच वमन केल्यास कफ निघुन जातो. वमन केल्यास पचनक्रिया सुधारते बद्धकोष्ठता दुर होते, डोकेदुखी, आम्लपित्ताचा त्रास कमी होतो.

त्राटक

डोळयाच्या शुध्दीसाठी त्राटकक्रिया सगळयात महत्वाची आहे.

निष्कर्ष

• कामगारांनी श्वसन संस्थेवर प्राणायाम केल्यामुळे सकारात्मक परिणाम होऊ शकतो.
• कामगारानी केलेल्या आसनामुळे चांगला सकारात्मक परिणाम होऊ शकतो.
• कामगाराच्या श्वसन संस्थेवर शुध्दीकिया केल्यामुळे चांगला सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सूची

- आगलावे प्रदीप (२०००) “संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे, श्री विद्या प्रकाशन, नागपूर
- जैन, डॉ. सौ. किरण “योग सिध्दांत शरीर शास्त्रात योगशिक्षक पदविका अभ्यासक्रम"
- स्वामी रामदेव “प्राणायाम रहस्य, दिव्य प्रकाशन, पतंजली योगपीठ
- स्वामी दिगंबर व घरोटे एम.एल, “हठयोग पदविका, १९९८, कैवल्यधाम, लोणावळा
- मकरंद गौरे “शरीर विज्ञान कैवल्य धाम, लोणावळा.

शेतकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक समस्येवर योगाची उपयुक्तता अभ्यासाने

सुनिता रमेश ढुमणे

प्रस्तावना

योग या शब्दाची उत्पत्ती संस्कृत भाषेतील 'युजिर' या धातूपासून झालेली आहे. याचा अर्थ जोडणे,युक्त करणे, सम्मिलित करणे,बांधणे असा होतो.विविध भारतीय परंपरांमध्ये योगाच्या विविध व्याख्या सांगितलेल्या आहे.त्रिवेणी संगम असणारे मुनीश्रेष्ठ वर्षी पतंजलींनी सांगितल्याप्रमाणे,

योगचित्तवृत्तिनिरोध: ।।१.२।। पा.यो.सू

योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध.सर्व प्रकारच्या मनोव्यापारांचे संयमन! चित्तशांती !!

चित्त म्हणजे त्रिगुणात्मक प्रकृतीचे,पुरुषाच्या सानिध्यात भासमान होत असलेले चेतन स्वरूप. मानवी अस्तित्वाच्या शारीरिक,मानसिक,बौद्धिक आदी स्तरांवर वेगवेगळ्या प्रकारे ते प्रगट होत असते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे.शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.शेती हा मानवाचा प्रमुख व्यवसाय सर्व आहे.सर्व मानवजातीची अन्नधान्याची गरज या व्यवसायातून भागवली.शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून असतो.शेतीशिवाय अन्य कोणताही व्यवसाय करीत असला तरी 'काळया आईशी ' इमान राखणे हे आपले आद्य कर्तव्य ठरते.असे असले तरीही शेती आणि शेतकऱ्याला पाहिजे तेवढी प्रतिष्ठा अजूनही आपल्या देशात प्राप्त झालेली नाही.बहुतांश शेतकऱ्यांची मुले शिकून पदवीधर झालेली आहे.निरनिराळ्या व्यवसायात कार्यरत आहे काही शेतीव्यवसाय करण्यात मग्न आहे.

या संशोधनामध्ये गुणात्मक पद्धतीचा वापर तसेच वर्णनात्मक, विश्लेषणात्मक पद्धतीने करण्यात आलेले आहे. विदर्भामध्ये नागपूर विभाग ६ जिल्हे व अमरावती ५ जिल्हे येथील शेतकरी व त्यांच्या शारीरिक व मानसिक समस्या त्यावर योगाची उपयुक्तता याचा अभ्यास या

संशोधनामध्ये केल्या जात आहे.संशोधनाचा उद्देश स्पष्ट करण्यासाठी प्रकरण १ते ४पर्यंत मुद्देसूद विस्तारण केलेले आहे.

शेती व्यवसायाची ओळख

१.१ विदर्भाचा इतिहास

विदर्भ हा महाराष्ट्र राज्याचा ईशान्य दिशेला असणारा प्रदेश आहे.विदर्भ महाराष्ट्र प्रांताचे एक उपक्षेत्र आहे.या उपक्षेत्रात एकूण ११ जिल्हे येतात.

	विभाग	जिल्हे
विदर्भ	नागपूर ६जिल्हे अमरावती ५जिल्हे	२२जिल्हे
मराठवाडा	औरंगाबाद विभाग	८जिल्हे
खानदेश	नाशिक विभाग	५ जिल्हे
देश	पुणे विभाग	५ जिल्हे
कोकण	कोकण विभाग	७ जिल्हे

विदर्भामध्ये नागपूर विभाग ६ जिल्हे अमरावती ५ जिल्हे येथील शेतकरी व त्यांच्या शारीरिक व मानसिक समस्यावर योगाची उपयुक्तता याचा अभ्यास या संशोधनामध्ये केल्या जात आहे.

१.२ विदर्भातील शेती व पीकपद्धती :

भरवसा नसलेल्या हवामानामुळे शेतीची समीकरणे बदलली असताना विदर्भातील शेतकरी अद्यापही पारंपारिक शेतीच्या चक्रव्यूहात अडकून पडल्याचे चित्र आहे. शेती पूरक जोडधंद्याकडेही शेतकऱ्यांचे दुर्लक्ष होत असून कापूस,संत्रा, सोयाबीन,गहू,हरभरा,तसेच काही पट्ट्यात धान,ऊसलागवडीतून उत्पन्न मिळविण्याची वर्षानुवर्षे सुरू असलेली पारंपरिक शेती पद्धती

यासाठी जबाबदार ठरत आहे. निसर्गाचा प्रकोप, पावसाची हुलकावणी,रोगांचा प्रादुर्भाव आणि कर्जाचा डोंगर या दृष्टचक्रात शेतकरी सापडला असला तरी काही भागातील शेतकऱ्यांनी मात्र,नव्या पिकांच्या लागवडीवर भर देऊन भरघोस उत्पन्न मिळवत क्रांती घडविली असून कमीत कमी पाण्याचा वापर आणि सेंद्रिय खतांच्या वापरातून कोरडवाहू शेती तंत्रातही नफा मिळविता येऊ शकतो.

शेतकऱ्यांची शेतीनिष्ठा

बैल हे शेतकऱ्यांचे दैवत आहे. म्हणून त्यांची चारा-पाण्याची सोय,त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे त्यांना विश्रांती मिळावी या उद्देशाने कधी-कधी यंत्राचा वापर करणे शेतीतील कामे उरकण्याचा प्रयत्न करणे,जमिनीवर प्रेम करणे,तिच्यावर नाराज नसणे.वेळच्या वेळी टूक साधून जमिनीची मशागत करणे.रासायनिक खताचा वापर कमी प्रमाणात करून सेंद्रिय खते व शेणखत यांचा वापर अधिक करणे.

शेतकामासाठी लागणारे व्यवसाय साधने नेहमी काळजीपुर्वक ठेवणे. मजुरांच्या अगोदर आपण शेतात हजर राहणे,नवीन पिके,खते किटकनाशके,यांचा अनुभव पाहूनच त्यांचा उपयोग करणे. प्रगतिशील शेतकऱ्यांच्या शेताला भेटी देऊन त्याचा अवलंब करणे. हे सर्व कामे सतत दरवर्षी चालत असते.दरवर्षी शेतात राबराब राबणाऱ्या शेतकऱ्यांची नाळ जुळुन असल्यासारखी त्यांची शेतीवर शेतीनिष्ठ असल्याचे दिसून येते.

शेतकऱ्यांच्या समस्या

३.१ शेतकऱ्यांच्या शारीरिक समस्या –

- पाठीच्या मणक्याचे,मानदुखी,कंबरेचे व गुडघ्याचे आजार होतात.
- डिस्कस्लीप होणे,चक्कर किंवा अंधारी येणे,हातांची बोटे न वळणे,सांधे आकडणे,मान वळवण्यास त्रास होणे, उठ-बस करण्यास त्रास होणे इ.आजार शेतकऱ्यांमध्ये दिसून येतात.
- डोळ्यांची जळजळ होते.डोके गरम होणे,डोके दुखणे,चक्कर येणे व खूप घाम येऊन थकवा जाणवतो.

- त्वचा लाल होणे,खाजवणे,चट्टे पडणे असे विविध त्वचारोग व श्वसनाच्या समस्या व आजार होण्याचा धोका संभवतो.
- अपौष्टिक आहारामुळे महिलांमध्ये गर्भावस्थेत व स्तनदामातांनामध्ये अशक्तपणा, रक्तक्षय,रातांधळेपणा,गर्भपात तसेच प्रसूतीत बालमृत्यू व कुपोषित बालकांचा जन्म यासारख्या भीषण समस्या उद्भवतात.

३.२ मानसिक समस्या -

- मनात निरनिराळे भ्रम किंवा शंका निर्माण होतात.स्वतःशीच बडबड करणे किंवा पुटपुटणे.
- अकारण चिडचिड करणे,घरात वादावाद करणे, वागणुकीत नको असलेला फरक पडणे.
- एकाच वेळी अनेक कामे करण्याची इच्छा असते परंतु एकही काम पूर्ण न होणे.
- कोणत्याही कामात किंवा आनंददायी गोष्टींमध्ये रस न वाटणे.
- भूक मंदावणे वजन कमी होणे.झोप न लागणे किंवा खूप जास्त वेळेपर्यंत झोपून राहणे.
- शेतीच्या कामात लक्ष लागत नाही,थोड्या कामाचा थकवा जाणवतो.ठेवलेल्या वस्तू निट आठवण राहत नाही.
- मनात आत्महत्या करण्याचे विचार येतात.
- मनात न्यूनगंडाची भावना निर्माण होते किंवा अपराधीपणाची भावना निर्माण होते. उदास पडल्यासारखे वाटते.
- छातीची धडधड सतत वाढत असते व सतत चिंता वाढत असते. मनात तेच तेच नको असलेले विचार काढण्याचा प्रयत्न सुरू आहे सुद्धा पुन्हा-पुन्हा येतात.

❖ मानसिक ताणाची शारीरिक लक्षणे :

१.उच्च रक्तदाब,हृदय समस्या, मधुमेह. २.अशक्तपणा जाणवणे.
३.सतत डोकेदुखीची समस्या होणे. ४.डायरिया बद्धकोष्ठता होणे.
५.पोटात दुखणे. ६.पाठ दुखणे.
७.झोप न येणे. ८.अंगाला घाम सुटणे.
९.तोंड कोरडे होणे. १०. घास गिळण्यास त्रास होणे.

अशा समस्या निर्माण होऊ शकतात.या सर्व समस्येच्या दूरीकरण्यासाठी व शारीरिक,मानसिक कार्याची क्षमता वाढविण्यासाठी तसेच त्यांच्यावर ओढवणाऱ्या संकटांना सामोरे जाण्यासाठी योग साधना पद्धती उपयुक्त ठरते.

शेतकऱ्यांसाठी योग अभ्यासाची उपयुक्तता

४.३ शेतकऱ्यांच्या शारीरिक समस्या निवारणार्थ अष्टांगयोगातील यमाचे शारीरिक पातळीवरील अभ्यासाची उपयुक्तता

शारीरिक फायदे : यामुळे चांगले आणि शुद्ध जीवन जगण्यासाठी मदत करते. यम सर्वसामान्यांच्या व्यवहार आणि आचरणावर ध्यान केंद्रित करायला मदत करते.करुणा,अखंडता आणि दया वास्तविक अंतर्निहित प्रकृतीला समोर आणतात ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये यांचे यमामुळे चांगले दमन होते,ती ताब्यात राहतात.कोणतेही शारीरिक अतिकृत्य दुष्कृत्य घडत नाही.घात,आघात,अपघात यापासून शरीराचे संरक्षण होते. शिवाय हातून सत्कृत्येच घडू लागतात. यम नियमांचे पालन केल्याने स्वतःतील सुषुप्त शक्तींचे जागरण करण्यासाठी मदत होते.महर्षी पतंजली सांगितल्याप्रमाणे यम नियमांची साधना व्यक्तिमत्व विकासाकरिता अनिवार्य ठरते.समाजात शांती व सुव्यवस्था असावी म्हणून सर्वांनी करणे इष्ट आहे म्हणूनच शेतकऱ्यांनाही हा अभ्यास उपयुक्त ठरतो.

४.४ मानसिक उपयोगिता **:** मनाची नैसर्गिक प्रवृत्ती बहिर्मुख असते.इंद्रियांच्या माध्यमातून बाह्य विषयांकडे धाव घेणे हा त्याचा स्वभाव आहे.मनाची बाह्यगामी प्रेरणा नियंत्रित करून त्याला अंतर्मुख करणे अत्यावश्यक असते. सत्व गुणाने प्रभावित मनाची संतुलित अवस्था. बहिरंग योग साधना मनाला क्षिप्त,मूढ,विक्षिप्त,या अवस्थेमधून एकाग्र व निरुद्ध अवस्थेत आणण्यास मदत करते. म्हणूनच यमाच्या पालनाने शेतकऱ्यांचे मानसिक स्तर उंचावण्यासाठी महत्त्वाचे ठरते.

नियमाचे शारीरिक व मानसिक पातळीवर होणारा फायदा :

१ स्वच्छ राहण्याची सवय होते. २ आरोग्य व मनाची प्रसन्नता मिळते.

३ शारीरिक स्तरावरील त्यामुळे शरीराची आसक्ती कमी होते.

४ बाह्य शरीराच्या शुद्धीकरणाने त्वचा रोग दूर होतात.

५ नियम ही व्रतेच आचार-विचार बदलून टाकतात.

६ वैचारिक शुद्धी होते,सकारात्मक वृत्ती वाढते,मानसिक दृढता येते.

४.९ आसना द्वारे होणारे शारीरिक फायदे :

- लोकप्रिय संकल्पनेनुसार योग म्हणजे विविध शारीरिक स्थिती,म्हणजेच आसने शारीरिक तंदुरुस्तीसाठी या आसनांचा लाभ होतो.
- आसनांच्या अभ्यासामुळे,पचनसंस्था,मज्जासंस्था,श्वसनसंस्था इत्यादी शरीरसंस्थांचे कार्यही सुधारते याशिवाय अंतस्त्रावी ग्रंथीचे कार्य ही सुधारते त्यामुळेच आसनांचा अभ्यास शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत लाभदायक ठरतो.
- आसनांचा अभ्यास सहजपणाने केला तर शरीरात होणारे सूक्ष्मतर व सूक्ष्मतम बदल जाणीवेच्या कक्षेत येऊ शकतात.
- प्रत्येक आसनांमध्ये या संवेदना मज्जारज्जूमधून जात असतात.
- आसनांचा अभ्यास केल्यामुळे द्वद्वांचा ऱ्हास होतो म्हणजेच शित-उष्ण,सुख-दुःख लाभ-हानी,मान-अपमान इत्यादी द्वाद्वांमुळे शरीर व मन अस्थिर होत असते.आसनांचा अभ्यास केल्यास या द्वद्वांचा परिणाम शरीर-मनावर होत नाही.संघर्षपूर्ण स्थितीतही शारीरिक-मानसिक समतोल कायम राहू शकतो. द्वद्वांतील स्थिती प्राप्त करणे हाच योगसाधनेचा उद्देश आहे.

४.१० आसनाद्वारे होणारे मानसिक फायदे :

- शारीरिक पातळीवर केली जाणारी आसने,शरीराला आरोग्य स्थैर्य लवचिकता बरोबर अंतिमतः मानसिक पातळीवरच आणून सोडतात.सुखकारकता,अनंतसमापत्ति ही मानसिक पातळीवरचीच लक्षणे आहेत.
- आसनातून मनाला अनंताकडे वढविण्याचा मार्ग शेतीला तेथूनच शिथिलतेतूनच सांगितला गेला आहे.
- मनातील द्वद्वांवाचा नायनाट होतो असे सांगितले आहे.मनात येणाऱ्या परस्परविरोधी विचारांची मालिका खंडित करण्याचे सामर्थ्य आसनप्रक्रियेत आहे.
- वाईट विचारांचा प्रभाव कमी होऊन योग्य सकारात्मक विचारांचे स्फुरण मनात येऊन कल्याणकारक विचार,उच्चार व आचार व्यवहारात उतरतात.

४.१२प्राणायामाच्या अभ्यासाने होणारे शारीरिक व मानसिक उपयोग

१ प्राणायामाचा अभ्यास श्वसनेंद्रिये, रक्त व हृदय यांची कार्यक्षमता वाढविण्यास प्रभावकारी ठरतो.

२ पचनक्रिया व्यवस्थित होते व भूकही चांगली लागते.

३ मज्जासंस्था व अंतस्त्रावी ग्रंथी एकमेकांना सहकार्य करतात.त्यामुळे शरीराचे आतील वातावरणातसमतोल राखला जातो.

हठयोगप्रदीपिकेमध्ये सांगितल्याप्रमाणे

१ वात संबंधी रोग नष्ट होतात.

२ श्वास नलिकेची शुद्धी होते.पोटात उत्पन्न होणारे दोष दूर होतात.

३ नाका-तोंडातील कफ दूर होतो.पचनशक्ती वाढण्यास मदत होते.

४ धातुगत दोषांचे उच्चाटन होते.अंगी सृष्टी-संहार करण्याची शक्ती येते.

५ निद्रा व आळस अंगात उत्पन्न होत नाही.शरीर बलवान होण्यास मदत होते.

- सजगतेने केलेले श्वसनातील बदल म्हणजे प्राणायाम.या बदलांसाठी मोठ्या मेंदूला श्वसनावर कार्यरत ठेवावे लागते.मेंदू श्वसनाशी कार्यरत झाला की आपोआप मोठ्या मेंदूतील विचार शृंखला तुटली जाते.व मेंदूला कोणत्याही कार्यात एकाग्र होण्याची सवय लागते. हा मूलभूत परिणाम प्राणायामामुळे साधला जातो.
- मानसिक ताण, काळजी चिंता दूर होऊन म:नशांती लाभते.विचारात स्पष्टता येऊन सजगता निर्माण होते.मनाची एकाग्रता वाढते. मानसिक आळस दौर्बल्य कमी होते.प्राणशक्तीचे संयमन म्हणजे प्राणायाम.

४.१५ प्रत्याहाराचे शारीरिक व मानसिक उपयोग :

१ एक प्रकारची समाधानाची वृत्ती निर्माण होते.समाधानी वृत्ती ही चांगल्या सुखाची अनुभूती देते.

२ धावपळ कमी करते.याचा परिणाम व्यक्तिमत्त्वावर चांगला होतो.तो शरीराच्या स्थितीवरूणही जाणवू लागतो.

३ चेहऱ्यावर शांती समाधान विलसत असते.

४.१७ (अंतरंग योगाच्या)अभ्यासाने शेतकऱ्यांवर होणारे शारीरिक व मानसिक उपयोग : धारणा

१ धारणा,ध्यान यामुळे तर शरीराला खूपच उच्च प्रतीची विश्रांती मिळून ऊर्जा अनेक पटीने वाढते.

२ या प्रक्रियांमध्ये शरीर भावना फारसी रहातच नसल्याने हृदय श्वसनेंद्रिय,स्नायू, ज्ञानेन्द्रिये यांना संपूर्णतः विश्रांती मिळते त्यामुळे आयुष्य तर वाढतेच पण चांगल्या,उच्च प्रतिच्या आरोग्याचाही लाभ होते.रोगग्रस्त भागावर ध्यान केल्यास तो आजारही बरा होण्यास मदत होते.

उदा.शेतीच्या कामाचा आराखडा तयार करून करण्यात आलेले शेतकाम व आराखडा तयार न करता करण्यात आलेले शेतकाम या दोन्हही शेतकऱ्यांमधील शारीरिक व मानसिक उपयोग वेगवेगळे राहील.

ध्यान-

१ ध्यान केल्याने साधकाची क्षमता विशेषता शक्ती व सकारात्मक ऊर्जेमध्ये वाढ होत असते.२ आपल्या आंतरिक विकासासाठी ध्यान करणे आवश्यक सांगितलेले आहे.साधक परम शक्तीने बांधला जातो. परमात्मासोबत जोडून जातो.त्याच परमात्म्याची ऊर्जा,त्यांच्या आदेश संदेश त्याची कृपादृष्टी साधकापर्यंत स्वतःही पोहोचत असते.तो सतत प्रसन्न,संतुष्ट आणि आनंदित राहत असतो.त्याच प्रकारे बीजामध्ये वृक्ष,थेंबामध्ये सागर आणि दुःखामध्ये सुख देण्याची कला येत असते.

समाधि – १ धारणा,ध्यान,समाधी ही शेवटची तीन अंगे म्हणजे संयमानाची अंगे शांत व एकाग्र झालेल्या मनाला ज्ञान गंगेच्या प्रवाहात चांगले वळण देणारी अंगे मन पुर्णतः शांत,एकाग्र करणारी,मनाला विश्रांती देणारी ही अंगे फार महत्त्वाचे आहेत. २ मनाला ज्ञान प्रकाशात उजळून देत थेट आत्म्याचेच दर्शन घडवितात.मनातील मलिनता दूर होते मनोविकार विकल्प वृत्ती दूर होते.

३ योग्य-अयोग्य याचे निर्णय अचूक होतात जीवनात येणाऱ्या अनेक संकटं संघर्ष यांना सामोरे जाण्याची ताकद या धारणा ध्यानातून येते. कमी वेळात अधिक काम करण्याची क्षमता मन एकाग्र झाल्याने होते.

उपसंहार

अ.क्र.	वेळ	आसनक्रिया	प्रयोजन	कालावधी
१	४:०० ते ४:०३	गुरुवंदना	एकाग्रता	३ मिनिट
२	४:०३ ते ४:०६	पूरक हालचाल	उजळणी	३ मिनिट
३	४:०६ ते ४:०९	सूर्यनमस्कार	उजळणी	३ मिनिट
४	४:०९ ते ४:१०	वज्रासन	पूर्वस्थितीचे आसन	१ मिनिट
५	४:१० ते ४:१७	उष्ट्रासन	नवीन शिकविण्याचे आसन	७ मिनिट
६	४:१७ ते ४:१८	शशांकासन	पूर्ण कलावधीचे आसन	१ मिनिट
७	४:१८ ते ४:१९	मकरासन	विश्रांती	१ मिनिट
८	४:१९ ते ४:२०	शलभासन	उजळणी	१ मिनिट
९	४:२० ते ४:२२	कपालभाती	शुध्दीक्रिया	२ मिनिट
१०	४:२२ ते ४:२४	शवासन	विश्रांती	२ मिनिट
११	४:२४ ते ४:२५	नाडीशोधन प्राणायाम	प्राणायाम	१ मिनिट
१२	४:२५ ते ४:२६	शीतली प्राणायाम	प्राणायाम	१ मिनिट
१३	४:२६ ते ४:२८	ओमकार जप	मन:शांती	२ मिनिट
१४	४:२८ ते ४:३०	अंतिम प्रार्थना	मन:शांती	२ मिनिट

५.१ पाठयोजना - शेतकऱ्यांच्या उत्तम स्वास्थ्याकरिता तसेच शारीरिक व मानसिक समस्या निवारणार्थ योगाभ्यास ३० मिनिटांची पाठयोजना.

निष्कर्ष

शेतकऱ्यांच्या शारीरिक व मानसिक समस्येवर योगाची उपयुक्तता अभ्यासने असा संशोधन विषय,संशोधनानंतर खालील निष्कर्ष देण्यात आलेले आहे.

१ प्रथमतः विदर्भातील शेतकरी व शेतात काम करणारे कामगारही यांच्या समस्या प्रत्यक्षात निदर्शनास आल्या.

२ आज विदर्भातील वेगवेगळ्या भागात असलेल्या शेतकऱ्यांचे शारीरिक,मानसिक आरोग्याशी निगडित असलेल्या समस्या निवारणार्थ महर्षी पतंजलींनी सांगितलेला अष्टांग योगाचा अभ्यास व शेतकऱ्यांच्या उत्तम स्वास्थ्याकरिता तसेच शारीरिक,मानसिक समस्या सोडविण्यासाठी पाठयोजनेचा अभ्यास शेतकऱ्यांना देऊन समस्येचे निराकरणासंबंधी अध्ययन केले गेले. तत्पूर्वी गावाकडील शेतकऱ्यांना हा अभ्यासही देण्यात आला त्यावरून या अभ्यासाचा फायदा काही शेतकऱ्यांना झाला.

३ पुरुष शेतकरी व महिला शेतकरी या दोघांच्याही शारीरिक क्षमतेपेक्षा शेतातील काम करतांना जास्त ऊर्जा खर्च होत होते हे मुख्यतः लक्षात आले,तसेच त्यांची शारीरिक क्षमता वाढवून,ऊर्जा वाढावी यासाठी प्रस्तुत केलेला योगाभ्यास महत्त्वपूर्ण ठरला.

४ मानसिक समस्या उद्भवण्याचे कारण कोणते आहे याही बाबी इथे देण्यात आलेल्या आहे.

५ कधी काळी हाती येणारे पीक बदलत्या हवामानाचा परिणामामुळे हाती येत नसते,त्यातून सावरण्यासाठी,धीराने उभे राहण्यासाठी,मनात कुठलाहि वाईट विचार न आणता पुन्हा 'कर्ममग्न' शेतकरी व्हावा या उद्देशाने केलेल्या महत्त्वपूर्ण बाबींचा अभ्यास उपयुक्त ठरण्यास मदत झाली.

संदर्भ ग्रंथसूची

योग परिचय - विश्वास मंडलिक

ताण आणि आरोग्य मानसशास्त्र - डॉ.बी.एन.बर्वे

शरीर विज्ञान आणि योगाभ्यास - डॉ.मकरंद मधुकर गोरे

पातंजल योगदर्शन - डॉ.श्रीराम आगाशे

योगशिक्षक पदविका अभ्यासक्रम - डॉ.किरण जैन

बारोमास (कादंबरी) - सदानंद देशमुख

योगासन - डॉ.देवव्रत आचार्य

लोकराज्य परिसर अभ्यास भाग दोन २